स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविम/माध्य.परीक्षा/ 2834
दिनांक - 11/01/2023

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत..**

संदर्भ :- राज्यमंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/१९६ दि.११/०१/२०२३ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च २०२३ च्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यासाठी **दि.३१/०१/२०२३** पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

तरी **आपल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विहित मुदतीमध्ये या कार्यालयाकडे आवश्यक छाननी शुल्क भरुन समक्ष जमा करण्यात यावेत. पोस्टाने अथवा मुदतबाह्य प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**

(डी.एस.पोवार),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

81 – d/khamkar sm 10th exam / 11th cet prakatan letter format

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

**विषय– मार्च २०२३ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा–या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक , शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुद क्र.०५ नुसार याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे. तथापि कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२२ चा निकाल दिनांक १६/०१/२०२३ रोजी जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत विनंती केली आहे. सदर प्रस्तावास अनुसरून प्रस्ताव स्विकारण्याच्या दोन्ही तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षासाठीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | करावयाची कार्यवाही | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह नवीन प्रस्तावित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ डिसेंबर | सोमवार, दि.२३ जानेवारी २०२३ |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ जानेवारी | मंगळवार, दि.३१ जानेवारी २०२३ |

तरी उपरोक्त विहीत मुदतीत सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक : ११/०१/२०२३